मजकुर :—

दिनांक ०९/०३/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " Best Detection of the Month "माहे जानेवारी—२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जानेवारी—२०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष—०७, मुंबई . | गु.र.क्र.५२५/२०२१ कलम ४१९,४२० भादवि. सह कलम ६६(क),(ड) माहीती तंत्रज्ञान कायदा<br><br>( कांजुरमार्ग पोलीस ठाणे ) |

**—: "marathimatrimoni.com साईटवर बनावट खाते तयार करून, लग्नाचे खोटे आश्वासन देवुन, शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करण्यास भाग पाडुन फसवणूक " :—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात यातील फिर्यादी भाग्यश्री मंगेश पुडाळकर, वय २७ वर्षे, यांनी जुलै २०२१ मध्ये marathimatrimony.com या विवाह जुळविणाऱ्या वेबसाईटवर नोंदणी केलेली होती. त्यानंतर त्यांना दिनांक १४/०९/२०२१ रोजी अनुराग चव्हाण, मोबाईल क्र. ९८६७१२३४५३ याने रिक्वेस्ट पाठविली असता तिने ती ॲक्सेप्ट केली. त्यानंतर त्या दोघामध्ये प्राथमिक बोलणी झाल्यानंतर त्याने त्याचा दुसरा मोबाईल क्र ९९८७९०४०९४ हा दिला व फिर्यादींना सदरच्या मोबाईलवर वॉटसॲपवर संपर्कात राहण्यास सांगितले. त्यानंतर त्याने तो खुप श्रीमंत असल्याचे भासवुन त्याच्या वडीलांचा पेट्रोलपंच आहे व तो स्वत: इंजिनियर असुन ॲपल कंपनीत काम करीत असल्याचे सांगितले. तसेच तो अमेरीकेच्या शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करून दररोज ०१ ते ०२ लाख रूपये कमवित असल्याचे सांगितले. तसेच फिर्यादींशी भावनिकदुष्टया गोड बोलुन त्याचे तिच्यावर खुप प्रेम असल्याचे सांगुन थोडयाच दिवसामध्ये लग्न करण्याचे आश्वासन देवुन तिने तिच्या आई—वडीलांसाठी काहीतरी गुंतवणुक शेअर मार्केटमध्ये केली पाहीजे असे सांगितले. व फिर्यादींशी गोड बोलुन लग्नाचे आश्वासन देवुन व शेअर मार्केटमधुन पैशांचा चांगला परतावा मिळण्याचे आमिश दाखवुन वेगवेगळया खातेवर २,२५,०००/— रूपये घेवुन फसवणुक केली म्हणुन सदरचा गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | कुमारी भाग्यश्री मंगेश पुडाळकर, वय — २७ वर्षे, |
| फसवणुक रक्कम | :— | २,२५,०००/—रू |
| हस्तगत रक्कम | :— | — |
| आरोपी अटक व दिनांक | :— | अनुराग उर्फ विशाल सुरेश चव्हाण, वय — ३४ वर्षे,<br>**आरोपी अटक दिनांक १८/०१/२०२२** |

**तपास कौशल्य :—** सदर गुन्हयाचा समांतर तपास कक्ष ७, घाटकोपर, मुंबई यांचेकडुन करण्यात येत होता. सदर गुन्हयाचा तपास करत असताना गुन्हयातील पाहीजे आरोपी अनुराग चव्हाण याने फिर्यादीस दिलेले मोबाईल क्र. ९८६७१२३४५३, ९९८७९०४०९४ यांचे सीडीआर व एसडीआर प्राप्त केले असता सदरचे दोन्ही सिमकार्ड हे सुरेश लक्ष्मण चव्हाण, पत्ता — फ्लॅट कमांक १०१, तळमजला, श्रीहरी अपार्टमेंट, सम्राट अशोक शाळेजवळ, पुणे लिंकरोड, कल्याण पुर्व, जिल्हा—ठाणे. असा असल्याचे समजले. त्यानंतर सदरच्या दोन्ही मोबाईल क्रमांकाचे सीडीआरचे विश्लेषन केले असता त्यापैकी मोबाईल क्र ९९८७९०४०९४ हा दिनांक ०८/०५/२०२१ पासुन बंद असल्याचे दिसत होते. तसेच मोबाईल क्र ९८६७१२३४५३ याच्या सी.डी.आर., चे विश्लेषन केले असता त्यामध्ये सदरच्या मोबाईल क्रमांकाचे जास्तीत जास्त लोकेशन हे चिंचपाडा रोड, कल्याण पुर्व परीसरातील दिसत होते.

त्यानंतर सदरचा आरोपीचा शोध घेणेकरीता पथकासह आरोपीच्या मोबाईलचा एस.डी.आर., चा पत्ता फ्लॅट क्रमांक १०१, तळमजला, श्रीहरी अपार्टमेंट, सम्राट अशोक शाळेजवळ, पुणे लिंकरोड, कल्याण पुर्व, जिल्हा — ठाणे. येथे जावुन शोध घेतला असता सदरच्या पत्त्यावर अनुराग चव्हाण व सुरेश चव्हाण नावाचे कोणतेही इसम राहत नसल्याचे समजले. तसेच सदरचे घरही त्यांचे नावावर नसल्याचे समजले. त्यानंतर आजुबाजुच्या परीसरात त्यांचेबाबत माहीती घेतली असता त्यांचेबाबत कोणतीही माहीती प्राप्त झाली नाही. त्यांनतर सदर आरोपी वापरत असलेल्या मोबाईल क्रमांकाचे लोकेशन बघितले असता त्याचा पत्ता व लोकेशन हे वेगवेगळया ठिकाणावरील असल्याचे समजले.

त्यानंतर सदरचा आरोपी वापरत असलेल्या मोबाईल क्रमांकाशी संपर्कात असलेल्या दोन मोस्ट कॉलरचा शोध घेतला व त्यांना भेटुन त्यांचेकडे आरोपीबाबत माहीती घेतली असता ते सदरचे मोस्ट कॉलर यांचीसुद्धा सदरच्या आरोपीने मॅट्रीमोनीयल साईटवरून ओळख करून लग्न करण्याचे व शेअर मार्केटमध्ये पैसे कमवुन देण्याचे अमिष दाखवुन फसवणुक केलेली असल्याचे समजले.

त्यानंतर सलग दोन ते तीन दिवस कक्ष ०७ कार्यालयातील अधिकारी व अंमलदार हे सदरच्या आरोपीचा शोध चिंचपाडा, कल्याण पुर्व परीसरात शोध घेतला असता तो मिळुन येत नव्हता. त्यानंतर सदरचा आरोपी वापरत असलेले मोबाईल क्र.९८६७१२३४५३,९९८७९०४०९४ यामध्ये अजुन एक संशयित मोबाईल क्र.८०९७५३००५३ हा मोबाईल मिळुन आला. सदरच्या मोबाईल क्रमांकाचा सीडीआर, एसडीआर प्राप्त केला असता त्याचा एसडीआर सुद्धा सुरेश लक्ष्मण चव्हाण, पत्ता— फ्लॅट क्रमांक १०१, तळमजला, श्रीहरी अपार्टमेंट, सम्राट अशोक शाळेजवळ, पुणे लिंकरोड, कल्याण पुर्व, जिल्हा—ठाणे. याचे नावावर असल्याचे समजले. व त्याचे लोकेशन हे वरील दोन्ही मोबाईल क्रमांकाचे लोकेशन प्रमाणे चिंचपाडा, कल्याण पुर्व परीसरातील असल्याचे समजले. सदरच्या तीनही मोबाईल क्रमांकाचे लोकेशनवरून आरोपीचा शोध घेतला परंतु आरोपी मिळुन येत नव्हता.

सदरचा नवीन मिळुन आलेला मोबाईल क्रमांक ८०९७५३००५३ च्या सीडीआर चे विश्लेषन केले असता त्यामध्ये एक मोबाईल क्रमांक हा लोकल केबल नेटवर्क कार्यालयाचा मिळुन आला. सदरच्या मोबाईल क्रमांकाचा एसडीआर प्राप्त केला असता तो आरोपी वापरत असलेल्या मोबाईल क्रमांकाच्या लोकेशनच्या जवळपासचा असल्याचे समजले. त्यानंतर सदरच्या केबल नेटवर्क कार्यालयात जावुन सदरच्या प्राप्त नावाने व मोबाईल क्रमांकाशी लिंक असलेल्या पत्त्यावर केबल कनेक्शन आहे का याबाबत माहीती घेतली असता त्यांनी सदरच्या मोबाईल क्रमांक व नावावर केबल कनेक्शन असुन त्याचा पत्ता रूम क्रमांक २०६, बी विंग, श्रद्धा महल बिल्डींग, जनता कल्याण बॅक, चिंचपाडा, कल्याण पुर्व, जिल्हा—ठाणे. असे असल्याचे सांगितले. त्यानंतर सदरच्या पत्त्यावर पोलीस पथकासह गेलो असता सदरच्या फ्लॅटला बाहेरून कुलुप लावले असल्याचे दिसुन आले. परंतु आरोपी वापरत असलेल्या मोबाईल क्रमांकाचे लोकेशन हे त्याच परीसरातील दिसत होते.

त्यानंतर आरोपीबाबत काहीएक माहीती मिळुन येत नसल्याने सदरच्या केबल चालकास सदरच्या फ्लॅटची केबल बंद करण्यास सांगितले परंतु त्यानंतरसुद्धा केबल चालु करण्यासाठी आरोपी वापरत असलेल्या मोबाईलवरून संपर्क केला नाही. त्यामुळे आरोपी मिळणे कठीण झाले होते.

त्यानंतर आरोपी राहत असलेल्या बिल्डींगमध्ये बाहेरून येणारे सर्व लोक कोणत्या फ्लॅटमध्ये जातात यावर लक्ष ठेवुन असताना एक इसम हा सदरच्या फ्लॅटच्या बाहेर येवुन उभा राहीला व सदरच्या फ्लॅटच्या दरवाजाच्या खालच्या बाजुने आतमधुन कुलुपाची चावी बाहेर उभ्या असलेल्या इसमाकडे दिली. त्यानंतर बाहेर उभ्या असलेल्या इसमाने नमुद फ्लॅटचा दरवाजा उघडला. त्यावेळी पोलीस पथकाच्या असे लक्षात आले कि, संशयित आरोपी हा नमुदच्या फ्लॅटमध्ये राहत असुन तो बाहेरून कुलुप लावुन आतमध्ये राहत आहे. त्यानंतर तात्काळ सदरच्या फ्लॅटमध्ये पोलीस पथक गेले असता नमुद गुन्हयातील संशयित इसम अनुराग चव्हाण उर्फ विशाल सुरेश चव्हाण हा मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन कक्ष ०७, घाटकोपर, मुंबई येथे आणले असता त्याने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्याकरीता कांजुरमार्ग पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले. त्यानंतर कांजुरमार्ग पोलीस ठाणेकडुन त्यास अटक करून पुढील तपास करण्यात येत आहे.

सदर आरोपीकडे केलेल्या तपासावरून व त्याचे सी.डी.आर., चे विश्लेषणावरून सदरचा आरोपी हा मॅट्रीमोनियल साईटवर वेगवेगळे बनावट खाते तयार करून तसेच ॲपल कंपनीचे मोबाईल स्वस्त रूपयांमध्ये देण्याचे खोटे आश्वासन देवुन तसेच वेगवेगळया कंपण्यामध्ये नोकरीस लावण्याचे खोटे आश्वासन देवुन लोकांकडुन पैसे घेवुन फसवणुक करीत असल्याचे समजले. अशा प्रकारे वेगवेगळया ५० ते ६० महीला व इतर इसमांची ४० ते ५० लाख रूपयांची फसवणुक केल्याची माहीती प्राप्त झाली.

गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपीकडे केलेल्या सखोल तपासामध्ये ०६ गुन्हे उघडकिस आलेले आहेत.

१) कांजुरमार्ग पोलीस ठाणे, मुंबई, गुरक्र. ५२५/२०२१ कलम ४१९, ४२० भादवि. सह कलम ६६(क),(ड) माहीती तंत्रज्ञान कायदा.

२) ए पी एम सी पोलीस ठाणे, नवी मुंबई, गुरक्र. २५/२०२२ कलम ४१९,४२० भा.दं.वि., सह कलम ६६(क),(ड) माहीती तंत्रज्ञान कायदा.

३) कासारवडवली पोलीस ठाणे, ठाणे शहर, गुरक्र. १७/२०२२ कलम ४०६,४२० भा.दं. वि.,

४) अंबड पोलीस ठाणे, नाशिक, गुरक्र. ६३/२०२२ कलम ४२० भा.दं.वि.

५) कल्याण तालुका पोलीस ठाणे, ठाणे ग्रामीण, गुरक्र. ४२० भा.दं.वि.,

६) गच्चीबौली पो. ठाणे, राज्य – तेलंगणा, गुरक्र. ५६१/२०२१ कलम ४२० भा.दं.वि., सह क ६६ ड माहीती तंत्रज्ञान कायदा.

७) सायन पोलीस ठाणे, मुंबई गुरक्र. १४६/२०१७ कलम ३७६,४२०,३६४,३५४,५०६ भा.दं.वि., सह कलम ६६,६७ माहीती तंत्रज्ञान कायदा मध्ये अजामिनपात्र वॉरंट.

तरी गुप्रशा. गुअवि. कक्ष ०७ मधील नमुद अधिकारी व अंमलदार यांनी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार स्वतंत्र तपासी पथके तयार करून गुन्हयाची खबर मिळाल्यापासून ते गुन्हा उघडकीस येईपावेतो अखंडीत व अथक तपास करून गुन्हयाचे अनुषंगाने सीडीआर चे विश्लेषण करून यातील आरोपी कोण आहे ते निष्पन्न केले. व आरोपीचा ठाव ठिकाणा मिळाल्यानंतर त्यास ताब्यात घेऊन गुन्हा उघडकीस आणलेला आहे तसेच इतर ०६ गुन्हे उघडकिस आणलेले आहेत

## गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—०७, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | श्रीमती. प्रिया थोरात | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | सुधीर जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | अमोघसिद्ध ओलेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | रामदास कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | स्वप्नील काळे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | मसपोउनि. ०४११०४ | निधी धुमाळ | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र.३०७१७ | अरूण सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र.३२८०७ | संतोष गुरव | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र.९६०१८३ | सुभाष मोरे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ना.क्र.००८२० | विनोद पांडे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोनाक्र. ०३०८३५, | प्रमोद जाधव | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पोशिक्र.०८०८७२ | विकास होनमाने | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पोशिक्र. ०८०५०० | लुकमान सय्यद | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पोनाचाक्र. ००६८८ | राजाराम कदम | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक ०९/०३/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' BEST CONVICTION OF THE MONTH "माहे जानेवारी २०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जानेवारी— २०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | शीव पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ—०४ | गु.र.क्र. ४८६/२०१७, कलम ३६३,३०२ भा.दं.वि., |

—: '' अपहरण व खुन '':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयातील आरोपीचे फिर्यादी नामे चॉदनी अब्दुल करीम शेख वय २० वर्षे,धंदा—गृहिणी, रा.ठी. अॅथालॉटीक हॉल, समोरील फुटपाथ ख्रिश्चन कब्रस्तानच्या बाजुला, भाऊ दाजी रोड, सायन (प), मुंबई.२२ हिचेवर एकतर्फी प्रेम असल्याने फिर्यादीला लग्न करण्याबाबत आमिष दाखविले. फिर्यादीने लग्नास नकार दिल्याने आरोपीत याने रागाच्या भरात फिर्यादीची दिड महिन्याची मुलगी आफरीन वय ४५ दिवस हिला पळवून नेवून तिचा सायन ब्रिजखाली भिंतीवर आपटून खून केला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | चॉदनी अब्दुल करीम शेख वय २० वर्षे |
| बळीत | :— | आफरीन वय ४५ दिवस |
| निकाल दिनांक | :— | दि.२८.०१.२०२२ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | असगरअली मतीनुर रेहमान शेख उर्फ अक्षय खन्ना वय ५१ वर्षे<br>अटक दि. २२/१२/२०१४ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद आरोपीस कलम ३६३,३०२ भा.द.वि., अन्वये आजन्म कारावास व १० हजार दंड तसेच दंड न भरल्यांस १ वर्षे ३ महिन्याची कारावासाची शिक्षा सुनावली आहे |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयातील साक्षीदारांचे जबाब नोंद करून तपास करणारे तपासी अधिकारी, आरोपीतास अटक करून त्याचे विरूध्द दोषारोपपत्र विहितवेळी दाखल केले.

तसेच नमुद गुन्हयात साक्षीदार यांना वेळेवर मा. न्यायालयात हजर करणारे समन्स वॉरंट स्टाफ, न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम करून मा. न्यायालयात अटक आरोपी विरूध्द शिक्षा लागणे योग्य साक्षीदार हजर करून सबळ पुरावे सादर केल्याने आरोपीस मा. न्यायालयाने आजन्म कारावास व रु. १०,०००/— ( दहा हजार रुपये ) दंड शिक्षा सुनावलेली आहे. तसेच दंड न भरल्यास एक वर्ष व ३ महिन्याची शिक्षा.

शीव पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | | श्री. विजय खैरे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. मनोज हिर्लेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. रमेश दुखंडे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | कृष्णाधर प्रल्हाद थोरात | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | म.पो.ह.क्र. ५०३ | संध्या संतोष पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | मपोशि क्र ११२२६७ | मिनल विकास बेलदार | प्रशस्तीपत्रक |